# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

-------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०२३ / श्रावण, ९, १९४५ ( शके )

**(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज ,पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(६) महिला व बालविकास मंत्री**
**(७) क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
**(८) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---------------------------------------

### बीड जिल्हयात जलजीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत होत असलेल्या अनियमिततेबाबत

**(१) * ६८०३७ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

( १) बीड जिल्हयात जलजीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत शासनाने खडकीघाट, धनगरवाडी, कोळवाडी, काठोडा, मोची-पिंपळगाव, चिंचोलीमाळी/दहीफळ, बेलवाडी, कोल्हारवाडी, ईट, बाभळवाडी, बोरफडी, कानडीघाट, मांडवखेल, काटवटवाडी, हिंगणी बु. व अन्य गावांची निवड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, काकडहिरा (जि.बीड) येथील कामांची टाटा कन्सल्टींग इंजिनियरिंग लिमिटेड या त्रयस्थ संस्थेमार्फत चौकशी केली असता त्यांनी अनेक प्रकारच्या त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामांमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व निकृष्ट दर्जाबाबत गावनिहाय तक्रारी असतानाही तक्रारीचे निरसन करण्याऐवजी तसेच वॅप्कोस कंपनीस नियमानुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्याचा अधिकार नसतानाही प्रत्यक्ष साईटला भेट न देता कंपनीने सादर केलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या आधारे जिल्हा परिषदेने सदर देयके अदा केल्याचे माहे एप्रिल-मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास अनेक तक्रारवजा निवेदने देऊन पाणी प्रश्न सोडविण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

परंतु, टाटा कंन्सल्टींग इंजिनिअरिंग लि. या त्रयस्थ संस्थेमार्फत शासन निकषानुसार ३०% काम झाल्यावर तपासणी केलेली आहे. त्यामध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटीची पुर्तता करुनच पुढील कामे पुर्ण करण्यात येत आहेत.

(३) सदर योजनेवर कुठल्याही प्रकारचे देयक अदा करण्यात आलेले नाही. सध्या योजनेचे काम प्रगतीत आहेत. तसेच मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या दिनांक ०१.०९.२०२२ रोजीच्या पत्राप्रमाणे वॅप्कोस कंपनीच्या अभियंत्यांना मोजमाप पुस्तिका लिहिण्याचे अधिकार प्रदान आहेत. त्या अनुषंगाने बीड जिल्हा परिषद अंतर्गत जल जीवन अंतर्गत केलेल्या कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तीकेत नोंदविण्यात आलेल्या आहेत. तसेच कुठल्याही प्रकारचे निकृष्ट दर्जाच्या कामाची देयके अदा केलेली नाहीत. व गावनिहाय तक्रारीच्या अनुषंगाने शासन नियुक्त टाटा कंन्सल्टंट मार्फत तपासणी करून घेण्यात येत आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून कुठल्याही गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गेवराई (पायगा) (ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर) या गावात विहीरी मंजूरी कामात होत असलेला गैरव्यवहार

**(२) * ६४६१६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (पायगा) (ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर) या गावासाठी शासकीय योजनेअंतर्गत २० विहीरी खोदाईचे प्रस्ताव शासनाने मागील वर्षी मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहीरी मंजुर करण्यासाठी तेथील गटविकास अधिकारी तसेच अन्य अधिकारी-कर्मचारी शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी करीत असून पुर्तता न झाल्यास शेतकऱ्यांची अडवणूक करीत असल्याची तक्रार ग्रामपंचायतीचे सरपंच (श्री. साबळे) यांनी फुलंब्री पंचायत समिती प्रशासन तसेच जिल्हा परिषद प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच्या निषेधार्थ सरपंचानी शेतकऱ्यांकडून जमा केलेली जवळजवळ रुपये २ लाख पंचायत समिती कार्यालयासमोर उधळल्याचे दिनांक १ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच श्री.साबळे यांच्या विरोधात फुलंब्री पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून श्री.साबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी अध्यक्ष, अखिल भारतीय सरपंच परिषदेने शासनाकडे केली असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) ग्रामपंचायत गेवराई (पायगा) ता.फुलंब्री, जि. संभाजीनगर यांचे मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तीक सिंचन विहीरीचे एकूण २१ प्रस्ताव मंजूर असून २० कामे चालू आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) दि.३१.०३.२०२३ रोजी ग्रामपंचायत गेवराई (पायगा) चे सरपंच श्री.मंगेश साबळे यांनी पंचायत समिती फुलंब्री कार्यालयासमोर नोटा उधळल्या आहेत,हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे नाही. अध्यक्ष, अखिल भारतीय सरपंच परिषद यांचे निवेदन / मागणी प्राप्त नाही.

(६) प्रस्तुत प्रकरणी पोलीस ठाणे फुलंब्री येथे दि.३१.०३.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

## राज्यात बालसंगोपन तसेच बालन्याय निधीच्या अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना तत्काळ मिळणेबाबत

**(३) * ६४६८४ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), ॲड.राहूल कुल (दौंड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुळे अनाथ झालेल्या बालकांच्या संगोपनासाठी सुरु केलेल्या बालसंगोपन योजनेअंतर्गत माहे ऑक्टोबर, २०२३ पासूनचे अनुदान लाभार्थीना अद्याप मिळाले नसून काही ठिकाणी निधीचे वाटप संथगतीने सुरु असल्याने बालकांच्या शिक्षण व इतर आवश्यक गरजा पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत देण्यात येणारी मदत प्रतिमाह रु.११०० वरून रु.२५०० करण्याचे मा.वित्तमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी अद्याप झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याकडे जमा झालेला दंड किंवा तत्सम रकमेतून कोरोना काळात पालक दगावलेल्या मुलांच्या शिक्षणासाठी प्रति विद्यार्थी १० हजार रुपयांची रक्कम बालन्यायनिधीच्या माध्यमातून दिली असून प्रत्येक जिल्ह्यासाठी सुमारे १ कोटी रुपये इतकी रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविली असतानाही अनेक मुलांच्या नावावर सदर रक्कम जमा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना अनुदानाचे नियमित वाटप, बालन्यायनिधी, वाढीव रकमेची अंमलबजावणी करणेसंदर्भात तसेच विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही,

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये सदर योजनेंतर्गत ५४७१७ लाभार्थ्यांना रुपये ७२६८.९७ लक्ष (रुपये बहात्तर कोटी अडुसष्ठ लाख सत्त्याण्णव हजार) एवढी तरतूद वितरीत करण्यात आलेली असून या योजनेंतर्गत सन २०२३-२४ मधील अर्थसंकल्पित निधी रु.५४८४ लक्ष ( रुपये चोपन्न कोटी चौऱ्याऐंशी लाख फक्त) लाभार्थ्यांना वितरीत करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही,

शासन निर्णय, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ अन्वये बालसंगोपन योजनेंतर्गत बालकांच्या संगोपनासाठी पालकास प्राप्त होणा-या परिपोषण अनुदानात रू.११००/- वरून रू.२२५०/- व संस्थेस उपलब्ध करण्यात येणारे प्रतिबालक प्रतिमहा अनुदानात रू. १२५/- वरून रू.२५०/- अशी एकूण रू. २५००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. सदरची वाढ दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून लागू करण्यात आली आहे.
(३) हे, अंशत: खरे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल संकीर्ण याचिका क्र. ३७७/२०१८ (स्वेता दणाणे वि. केंद्र शासन व इतर) मध्ये दि.२०.१०.२०२१ रोजी देण्यात आलेल्या आदेशान्वये रू. २५,५३,२५,५४८/- इतकी रक्कम बाल न्याय निधीमध्ये जमा करण्यात आली आहे.
सदर रक्कम ही कोविड-१९ मुळे एक वा दोन्ही पालक गमावलेल्या सर्व बालकांना सरसकट वितरीत करणे अपेक्षित नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर रक्कमेचा विनियोग कोविड १९ मुळे एक वा दोन्ही पालक गमावलेल्या बालकांच्या शैक्षणिक खर्चासाठी (शाळा फी, वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य ई. साठी) करणे आवश्यक आहे. जिल्हा स्तरीय कृती दलाकडून अर्जांची छाननी करुन या बालकांना रु. १०,०००/- इतक्या मर्यादेत एक वेळाचे आर्थिक सहाय्य उपलबध करुन देण्यात यावे असे आदेश मा. न्यायालयाकडून देण्यात आले आहेत.

मा. न्यायालयाने विहीत केलेल्या निकषांनुसार पात्र बालकांना आर्थिक सहाय्य देण्यात आले असून यासाठी रु. ९५० लक्ष इतकी रक्कम आतापर्यंत खर्च झाली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात रक्तपेढयांमधून देण्यात आलेल्या रक्तातून एड्सचा होणारा संसर्ग रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(४) * ६४५९४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.निलेश लंके (पारनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिलराऊत (विक्रोळी),श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात  रक्तपेढयामधून देण्यात आलेल्या रक्तातून एड्स संसर्गाचे प्रमाण सन २०१७ ते सन २०२२ पर्यंत १०१० इतके असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य तसेच देशस्तरावर जनजागृती, रक्तदाताविषयी जागरुकता, तसेच इतरही नियमांची काटेकार अंमलबजावणी होऊनही राज्यात वाढत असलेले एड्सचे प्रमाण लक्षात घेता सध्या एच.आय.व्ही. तपासणीसाठी अस्तित्वात असलेली एलायझा टेस्ट ही कालबाह्य व पुरेशी सुरक्षित नसल्याने त्याऐवजी न्यूक्लिअर ॲसिड टेस्ट चाचणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,राज्यात रक्तपेढयामध्ये एन्झाईम लिंक्ड इम्यूनोसोरबंट ॲसी टेस्टच्या माध्यमातून रक्ताची चाचणी केली जाते परंतु चाचणीमध्ये प्रचंड प्रमाणात त्रुटी आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रक्तपेढया मधील देण्यात येणा-या रक्ताद्वारे एड्सचा होणारा प्रसार रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.

रक्तसंकलनानंतर एच.आय.व्ही, एच.बी.व्ही. (Hepatitis B), एच.सी.व्ही. (Hepatitis C), व्ही.डी.आर.एल. (Syphilis), मलेरिया या चाचण्या करण्यात येतात व सदर संसर्गाद्वारे बाधित (एच.आय.व्ही. सहीत) रक्त पिशव्या नष्ट (discard) करण्यात येतात.  सन २०१७ ते २०२२ या दरम्यान एच.आय.व्ही. बाधित नष्ट करण्यात आलेल्या रक्त पिशव्यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| सन | एकूण रक्त संकलन | एच.आय.व्ही .बाधित नष्ट केलेल्या रक्त पिशव्यांची संख्या | एच.आय.व्ही. बाधित रक्त पिशव्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१७ | १६०२६९० | २७५५ | ०.१७ |
| २०१८ | १६५६५४२ | २६२९ | ०.१६ |
| २०१९ | १७२३३६३ | २५१४ | ०.१५ |
| २०२० | १५४६८०५ | ३१९६ | ०.२१ |
| २०२१ | १६७३९४७ | २३२८ | ०.१४ |
| २०२२ | १९२८९४७ | ४४६५ | ०.२३ |

(२) नाही.
(३) नाही.
(४) स्वैच्छिक रक्तदान हे सुरक्षित रक्तदान असते.  ही बाब विचारात घेता, स्वैच्छिक रक्तदानाविषयी जागरुकता निर्माण करण्यात येते.  यासाठी जागतिक रक्तदाता दिन, राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिन व  वेळोवेळी समाजात स्वैच्छिक रक्तदानाचे महत्व पटवून देण्यात येते.  त्यामुळे राज्याची स्वैच्छिक रक्तदानाची टक्केवारी ९९.३२ एवढी आहे.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्यांअतर्गत नियम १९४५ नुसार रक्त संकलनानंतर एच.आय.व्ही, एच.बी.व्ही. (Hepatitis B), एच.सी.व्ही. (Hepatitis C), व्ही.डी.आर.एल. (Syphilis), मलेरिया या चाचण्या एलायझा पध्दतीने करण्याची सक्ती आहे.  त्याप्रमाणे एलायझा पध्दतीने सर्व रक्तकेंद्रात संकलित होणाऱ्या रक्तपिशव्या तपासण्यात येतात.  न्युक्लिअर ॲसिड टेस्ट (NAT Test) ही एक अतिरिक्त सुरक्षा चाचणी आहे.  परंतू ती बंधनकारक नाही.  नॅट चाचणीमुळे विंडो पिरीएड 7 दिवसापर्यंत होतो.  तथापि, नॅट चाचणी देखील १००% सुरक्षित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सर जे.जे. महानगर रक्तपेढीमध्ये रक्त संक्रमणासाठी लागणा-या छोटया पिशव्या (ॲलिकॉट) तयार करणारी यंत्रे बंद असल्याबाबत

**(५) * ६५८५७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सर जे.जे. महानगर रक्तपेढीमध्ये रक्त संक्रमणासाठी लागणा-या छोटया पिशव्या (ॲलिकॉट) तयार करणारी यंत्रे दिर्घ काळापासून कार्यरत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य मानवी हक्क आयोगाने वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान नोटीस पाठवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) होय.

सदर नोटीसच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्यात आला आहे.

(३) सर जे.जे. महानगर रक्तकेंद्र, भायखळा येथे ॲलिकॉट बॅग बनविण्यासाठी Sterile Connecting Device हे यंत्र उपलब्ध आहे व ते कार्यरत होते. तथापि, त्यासाठी लागणारे कन्झुमेबल्स काही कालावधीसाठी उपलब्ध नव्हते. यासाठी हाफकीन बायोफार्मास्युटीकल्स यांचेकडे मागणी करण्यात आली होती. तथापि, निविदा प्रक्रियेस विलंब लागला. दरम्यानच्या कालावधीत स्थानिक पातळीवर खरेदी करुन बालरोग तज्ज्ञांच्या prescription नुसार रक्ताच्या ॲलिकॉट बॅग बालरुग्णांना वितरीत करण्यात आल्या.

सद्यस्थितीत ऑलिकॉट मशीन कार्यरत आहे. तसेच कन्झुमेबल्स देखील पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात कुपोषणामूळे होणारे बालमृत्यू रोखण्याबाबत करावयाच्या उपाययोजना

**(६) * ६४५७९ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात माहे एप्रिल, २०२२ ते माहे जानेवारी, २०२३ या १० महिन्यांच्या कालावधीत १५७ आदिवासी बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू आणि ७१ उपजत मृत्यू झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारणी उपजिल्हा रुग्णालय, चिखलदरा आणि चुर्णी येथील ग्रामीण रुग्णालयात आहारतज्ञ, बालरोगतज्ञ व स्त्रीरोगतज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे व तेरा दिवसांसाठी स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करण्यात येत असल्यामुळे तेथे बालमृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात मेळघाट, नंदूरबार यासह विविध आदिवासी भागात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूच्या समस्येवर मात करण्यासाठी नेमणूक केलेल्या १६ डॉक्टरांनी आदिवासी भागात रुग्णसेवेसाठी जाण्यास नकार दिल्याने त्यांच्यावर कायद्याप्रमाणे कारवाई करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनाला दिनांक १३ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मेळघाटात पुर्णवेळ बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ व आहारतज्ञांसह अन्य रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत तसेच आदिवासी भागात रुग्णसेवेसाठी जाण्यास नकार देणा-या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) माहे एप्रिल, २०२२ ते माहे जानेवारी, २०२३ या १० महिन्यांच्या कालावधीत ७१ उपजत मृत्यू आणि १५७ आदिवासी बालकांचा मृत्यू जन्मत: कमी वजनाचे बालक व प्री-मॅच्युरिटी, न्युमोनिया, मिल्क अस्फीकझिया, सेपटीसीमिया इत्यादी कारणामुळे झालेले आहेत.
(२) मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मेळघाट परिसरातील बाल मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांमध्ये तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपजिल्हा रुग्णालय चिखलदरा आणि ग्रामीण रुग्णालये, चुर्णी येथे दिनांक १०/०१/२०२२ पासुन प्रत्येकी १५ दिवसाच्या कालावधीकरीता आयुक्तालय स्तरावरुन स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.
(३) हे खरे आहे,

आरोग्य आयुक्तालयाने दिनांक ११/०४/२०२३ रोजीच्या आदेशान्वये दिनांक १३/०४/२०२३ ते दिनांक २७/०४/२०२३ या कालावधीसाठी एकुण २६ तज्ञांचे नियुक्ती आदेश निर्गमित केले होते. त्यापैकी २२ तज्ञ नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले व ४ तज्ञ हजर झाले नाहीत.

तसेच, दिनांक २८/०४/२०२३ ते दिनांक १२/०५/२०२३ या कालावधीसाठी २६ तज्ञांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यापैकी २० तज्ञ नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले असून ६ तज्ञ हजर झालेले नाहीत.

प्रतिनियुक्ती आदेशाप्रमाणे हजर न झालेल्या १० तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचेविरुध्द उपसंचालक स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस तसेच, ज्ञापन बजावून पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.
(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय आधिकारी गट अ (एस-२०) ची रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

तसेच, प्रत्येकी १५ दिवसाच्या कालावधीकरिता आयुक्त, आरोग्य सेवा कार्यालयाकडून स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतात.

सर्व जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सदर वैद्यकीय अधिकारी यांची दैंनदिन बायोमेट्रिक हजेरी तपासून प्रतिनियुक्ती कालावधीतील वेतन अदा करण्याबाबत सुचित केलेले आहेत. तसेच, उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला यांना प्रतिनियुक्तीने हजर न झालेल्या वैद्यकीय अधिकारी यांना त्यांचे स्तरावरुन ज्ञापन देण्याबाबत व संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक यांना पर्यायी व्यवस्था करण्यास करण्यास कळवावे असे सुचित केलेले आहे.

प्रतिनियुक्ती आदेशाप्रमाणे प्राप्त झालेल्या रुजू अहवालानुसार हजर न झालेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे विरुध्द उपसंचालक स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस तसेच ज्ञापन बजावून पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली येथे वैद्यकीय अभ्यास क्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणा-या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परिक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची चूकीच्या पध्दतीने तपासणी केल्याबाबत**

**(७) * ६५४८९ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथे वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टींग एजन्सीकडून घेण्यात येणा-या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परिक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची तपासणी करतेवेळी विद्यार्थीनींची अंतर्वस्त्र तपासणे तसेच उलटे कपडे परिधान करून परिक्षा देण्यास भाग पाडण्याचा प्रकार दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य महिला आयोगाने या प्रकरणी नॅशनल टेस्टींग एजन्सी (एनटीए) तसेच राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाला अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिक्षेला आलेल्या सर्व विद्यार्थ्याची अशाप्रकारे तपासणी करण्याची जबाबदारी परीक्षा केंद्र प्रमुख म्हणून कोणाच्या आदेशानुसार व कोणाकडे सोपवली होती तसेच किती विद्यार्थीनीची अशी तपासणी केल्याचे तपासात निदर्शनास आले,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन असा निर्णय घेणाऱ्या तपास अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

राज्य महिला आयोगाकडून नॅशनल टेस्टींग एजन्सीकडून (NTA) सदर प्रकरणाबाबत अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) सदरची परीक्षा नॅशनल टेस्टींग एजन्सी, नवी दिल्ली (NTA) यांचेमार्फत अखिल भारतीय स्तरावरून आयोजित करण्यात येते. सदर परिक्षेबाबतची आचारसंहिता ठरविण्याची संपूर्ण कार्यवाही नॅशनल टेस्टींग एजन्सीकडून करण्यात येते.

(४) राज्य शासनाव्दारे सदर परीक्षा आयोजनाबाबत कार्यवाही करण्यात येत नसून सदर बाब नॅशनल टेस्टींग एजन्सीच्या अखत्यारीत येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आरोग्य सेविका, अधिपरिचारीका व इतर एनएचएम कंत्राटी कर्मचा-यांना शासनाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(८) * ६४८५४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य सेविका, अधिपरिचारीका व इतर एनएचएम कंत्राटी कर्मचा-यांना अद्यापपर्यंत शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठाचा आदेशानुसार दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजीपर्यंत त्यांना शासन सेवेत समावेशन करण्याचे आश्वासन मा.आरोग्य मंत्री यांनी दोन्ही सभागृहात दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून शासन निर्णय जाहीर करत आरोग्य सेवेतील कंत्राटी परिचारिकांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे या मागणीसाठी धुळे जिल्हा आयटक कामगार संघटनेतर्फे धुळे येथे धरणे आंदोलन करण्यात आल्याचे माहे मे ,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आरोग्य सेविका, अधिपरिचारीका व इतर एनएचएम कंत्राटी कर्मचा-यांना शासनाच्या सेवेत समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचारधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय रुग्णालयात क्षयरोग विभागात कार्यरत असलेल्या
कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(९) * ६४५८८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यातील शासकीय रुग्णालयात संसर्गजन्य आजाराच्या क्षयरोग विभागात जीव धोक्यात घालून कंत्राटी म्हणून काम करणाऱ्या आरोग्य विभागातील सुमारे २२०० कर्मचाऱ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध होत नसल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्मचा-यांना मिळण्या-या अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे काही जणांचा मृत्यूही झाला असून अपुरे वेतन, विमा संरक्षण,नाममात्र वाहन भत्ता, अपुरी रजा यांसारख्या मागण्यांसाठी कर्मचारी वेळोवेळी आंदोलन करीत असल्याने याचा परीणाम राज्यातील राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन सदर कर्मचाऱ्यांना आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत २५७३ कर्मचारी कार्यरत आहेत. यापैकी निवडक संवर्गातील कर्मचा-यांना फिरतीसाठी दुचाकी वाहन, इंधनभत्ता, वाहन दुरुस्तीसाठी खर्च व प्रवासभत्ता, दैनिक भत्ता, क्षयरोगाची लागण झाल्यास ६ महिने भर पगारी रजा व रुग्णालयात तसेच क्षयरोग प्रयोगशाळेमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना पीपीई कीट देण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१९ - २० वेतन सुसूत्रीकरणाची प्रक्रिया पूर्ण झालेली असुन त्यानुसार सर्व कर्मचा-यांना मानधन लागू करण्यात आलेले आहे.

(३) सदर कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील रुग्णालयांच्या दर्शनी भागात उपचार आणि चाचण्यासंदर्भात आकारण्यात येणारे दरपत्रक लावण्याबाबत**

**(१०) * ६८३७९ श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक धर्मदाय/खाजगी रुग्णांलयांनी रुग्ण हक्काची सनद व दर पत्रक (द चार्टर ऑफ पेशंट राईट्स) ची माहिती दर्शनी भागात लावणे (परिपत्रकानुसार) कायद्याने बंधनकारक असल्याने रुग्णालयांमध्ये करण्यात येणा-या उपचार आणि चाचण्यासंदर्भात आकारण्यात येणारे दर रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावे असे निर्देश मा.आरोग्य मंत्री यांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत राज्यातील अनेक शासकीय, धर्मादाय व खाजगी रुग्णालयांत अशा प्रकारची दरपत्रके दर्शनी भागात लावण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक रूग्णालयात दरपत्रक वेगवेगळे असल्याने तसेच लागणाऱ्या खर्चाचा अंदाज न आल्याने गरीब रुग्णांना याचा नाहक भूर्दंड सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन प्रत्येक रुग्णालयाच्या दर्शनी भागात दरपत्रक लावणे संदर्भात तसेच याचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) दि. १४/०१/२०२१ रोजीच्या अधिसूचनेतील ११ (क्यू) मध्ये रुग्ण हक्क संहितेचा मुद्दा नमूद करण्यात आला आहे. तसेच अधिसूचनेतील अनुसूची-III मध्ये रुग्णालयाकडून ज्या सेवा पुरविण्यात येतात त्याबाबतचे दरपत्रक रुग्णालयाच्या दर्शनी भागात ठळकपणे लावण्याबाबत बंधनकारक करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील काही रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्काची सनद व दरपत्रक लावण्यात येत नसल्याबाबतची निवेदने जनसामान्य व्यक्तींकडून आयुक्तालयास प्राप्त झाली आहेत. यासंदर्भात सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयांनी रुग्ण हक्क संहिता दर्शनी भागात लावावी, याबाबत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या दि.११/१०/२०२१, दि.१५/११/२०२१, दि.१०/०१/२०२२ व दि.२६/०९/२०२२च्या पत्रानुसार सर्व जिल्ह्यांना व महानगरपालिकांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सुटाळा बुद्रुक व ढोरपगाव (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबत

**(११) * ६५३५३ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे, सुटाळा (बु.) व ढोपरगाव (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) (PIP) योजनेअंतर्गत नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणे बाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी देऊन बराच कालावधी होऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०२३ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा व तालुक्याच्या सन २०११ च्या लोकसंख्येनुसार नवीन प्राथमिक आरोग्य व उपकेंद्र बृहत आराखडयात मौजे सुटाळा (बु.) व ढोपरगाव या दोन गावांचा समावेश असतानाही त्याची अंमलबजावणी विभागाने केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या गावातील रुग्णांना आरोग्याच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी अत्यंत दूरचा प्रवास करून उपचारासाठी अन्य ठिकाणी जावे लागत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजे सुटाळा (बु.) व ढोपरगाव येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र तात्काळ सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

आयुक्तालय स्तरावरील छाननी समितीने मौजे सुटाळा बु व ढोरपगाव ता. खामगाव जि. बुलढाणा या दोन्ही संस्था निकषात बसत नसल्याची शिफारस केली होती. परतुं शासनाने दिनांक १९.०७.२०२१ च्या पत्रान्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत बृहत आराखडाच्या प्रस्ताव सादर करतांना ज्या बाबींचा अवलंब करण्यात आला होता त्या सर्व बाबीचा अवलंब करून सन २०११ च्या लोकसंख्येनुसार बृहत आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले.

सन २००१ चा बृहत आराखडा MRSAC या शासकीय संस्थेमार्फत सॅटेलाईट मॅपिंगव्दारे तयार करण्यात आला होता. त्यानुसार त्या संस्थेकडुन सन २०११ चा जोडबृहतआराखडा तयार करण्यासाठी MRSAC या संस्थेची नेमणुक करण्यात आली आहे. MRSAC संस्थेमार्फत Health GIS मोबाईल ॲप विकसित करून त्याव्दारे राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राचे GIS मॅपींग व प्रमाणीकरण पुर्ण करण्यात आले. सद्यस्थितीत MRSAC संस्थेमार्फत राज्यातील सर्व जिल्हयांचे आरोग्य संस्थानिहाय कार्यक्षेत्राचे नकाशे तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये बुलढाणा जिल्हयांचा समावेश आहे. MRSAC संस्थेकडून सर्व जिल्हयांचे नकाशे तसेच नवीन आरोग्य संस्था तपासणीबाबतचे टूल्स याकार्यालयास प्राप्त झाल्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयानी जोडबृहतआराखडयात मंजूरीकरिता प्रस्तावित केलेले प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार तपासून राज्याचा संकलित प्रस्ताव शासनाच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येणार आहेत.

(३) हे खरे नाही.

मौजे सुटाळा मुख्यालयी उपकेंद्र, असुन त्यामार्फत आवश्यक त्या आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. मौजे सुटाळा प्राथमिक आरोग्य केंद्र रोना अंतर्गत येत असुन त्यामार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. तथापि सदर गावापासुन ०५ किमी अंतरावर सामान्य रुग्णालय खामगाव असल्यामुळे जास्त रुग्ण तेथे जातात. तसेच मौजे ढोपरगाव उपकेंद्र काळेगाव व प्राथमिक आरोग्य केंद्र रोहणा अंतर्गत येत असुन यामार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

(४) कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालयात सुपरस्पेशालिटी सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(१२) * ६७४२० श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), अ‍ॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयामध्ये उपचारासाठी पुरेशा सुपरस्पेशालिटी सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना गंभीर आजारांवर तातडीने उपचार मिळत नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात आयव्हीएफ, आययूआय सुविधा नसून हृदयशल्यचिकित्सा, जठरांचे आजार, मेंदूविकार, नेफ्रॉलॉजी, मूत्रविकार व बालशल्यचिकित्सा इत्यादी सुविधा काही अंशीच पुरविल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या रुग्णालयात स्पेशालिस्ट, सुपरस्पेशालिस्ट मनुष्यबळाची पदे मंजूर नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात अवाजवी दराने उपचार घेणे भाग पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन ससून रुग्णालयात सुपरस्पेशालिटी सुविधा उपलब्ध करणे तसेच रिक्त पदे भरणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) नाही.

(५) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे सेवाप्रवेश नियमानुसार (५०:५०) आस्थापना मंडळामार्फत पदोन्नतीने व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बोरीवली येथील एका खासगी संस्थेने शासनाची परवानगी असल्याचे भासवून सुमारे दीड हजार संस्थाना कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाची मान्यता दिली असल्याबाबत

**(१३) * ६८८०० प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली येथील एका खासगी संस्थेने शासनाची परवानगी असल्याचे भासवून सुमारे दीड हजार संस्थांना कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाची मान्यता दिली असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दीड हजार संस्थांनी हजारो तरुणांना बेकायदा प्रशिक्षण देत शासनाची बोधचिन्ह असलेली प्रमाणपत्र दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर संस्थेविरुद्ध कस्तुरबा मार्ग पोलिस ठाणे, बोरीवली येथे संबंधित “Educational Board of Vocational Training & Research या संस्थेविरुद्ध दि. २५.०३.२०२३ रोजी तक्रार /एफ.आय.आर क्र. ०२२४ दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(१४) * ६७४०७ श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये खरेदी केलेले साहित्य जादा दराने करण्यात आले असून सदर खरेदीमध्ये ९९ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आरोग्य उपसंचालकाच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत चौकशी करण्यात येणार असल्याची घोषणा मा.आरोग्य मंत्री यांनी सभागृहात केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) सदर बाबत उपसंचालक ,आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांच्या स्तरावर चौकशी करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उपसंचालक ,आरोग्य सेवा, अकोला मंडळ,अकोला यांच्या स्तरावर चौकशी करण्यात येत असुन चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर येथील सलीम अली सरोवराकडे जाणाऱ्या ड्रेनेज लाइनचे काम करताना तीन मजूरांचा विषारी वायुमुळे झालेला मृत्यू**

**(१५) * ६७२१४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील सलीमअली सरोवराकडे जाणाऱ्या ४०० व्यासाची ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्यासाठी चेंबरच्या मॅनहॉलमध्ये उतरलेल्या तीन मजूरांचा विषारी वायुमुळे गुदमरून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ड्रेनेज लाइन काही दिवसांपासून तुंबल्याने यासंदर्भात स्थानिकांनी अनेकदा महानगर पालिकेकडे तक्रार करूनही याची कोणतीही दखल प्रशासनाने घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे** : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. याप्रकरणी कोणतीही तक्रार महानगर पालिका कडे प्राप्त नाही.

(३) सदर घटना खाजगी मिळकत धारकाने महानगर पालिकेची कोणतीही परवानगी न घेता खाजगी अप्रशिक्षित मजुरांकडून काम करून घेत असताना घडलेली आहे. या संदर्भात मिळकत धारकांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस प्रशासनाकडून तपास व पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) सदर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तिन्ही खाजगी कामगार/मजूर यांच्या वारसास महानगर पालिकेकडून प्रत्येकी १० लाख रूपये आर्थिक मदत देण्यात आली आहे.

-----------------

**अमरावती येथील जिल्हा स्त्री (डफरीन) रुग्णालयातील नवजात बालंकाच्या अतिदक्षता (एसएनसीयु) विभागामध्ये व्हेंटिलेटरसह अन्य सुविधा तातडीने उपलब्ध करणेबाबत**

**(१६) * ६४५६२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) येथील एसएनसीयु विभागात मागील ११ महिन्यात १७६ तर याच विभागातून इतर रुग्णालयात संदर्भित (रेफर) केलेल्या ३१ असे एकूण २०७ नवजात बालकांचा मृत्यू झाला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या विभागात मागील सहा महिन्यांपासून व्हेंटिलेटर नसल्याने गंभीर आजाराच्या बालकांना उपचार करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालयातील बालकांचे दुर्दैवी मृत्यू रोखण्यासंदर्भात तसेच तेथे व्हेंटिलेटरसह अन्य सुविधा तातडीने उपलब्ध करुन देणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महिला रुग्णालयातील एसएनसीयु व एनआयसीयु विभागात आवश्यक असणारी वैद्यकीय उपकरणे उपलब्ध आहेत. त्याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No | Equipment | Qty. | Working |
|---|---|---|---|
| १ | Ventilator | ३ | २ |
| २ | C-PAP | ९ | ८ |
| ३ | Radiant Warmer | २७ | २७ |
| ४ | Syringe Pump | १८ | १८ |
| ५ | Pulse Oximeter Bed Side | १३ | १३ |
| ६ | Phototherapy | १० | १० |
| ७ | Generator | १ | १ |
| ८ | Air Conditioner | १६ | ७ |
| ९ | Suction Machine | ८ | ८ |

(३) होय,

चौकशीमध्ये व्हेंटिलेटर अभावी बालके दगावली नसून १७६ बालकांचा मृत्यू हा जन्म: व्यंग, अत्यंत कमी वजनाचे नवजात बालके, अत्यंत कमी दिवसाची बालके, जंतुसंसर्ग, श्वास अवरोध, निमोनिया, Birth Asphyxia व अनुवंशिक आजार इ. कारणामुळे मृत्यू झाल्याचे दिसून येते.

तसेच, एप्रिल २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीमध्ये एसएनसीयु विभागात उपचाराला प्रतिसाद न मिळाल्याने एकुण २२५ गंभीर आजारी नवजात बालकांना पुढील उपचारासाठी Higher Centre संदर्भीत केले असता पाठपुराव्या दरम्यान ३१ बालकांचा मृत्यू झाला आहे.

(४) जिल्हा स्त्री रुग्णालय अमरावती येथे बालकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी एस.एन.सी.यु. आणि एन.आय.सी.यु. विभागात आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध आहेत. तसेच, बालकांचे मृत्यू रोखण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक, अमरावती यांच्या मार्फत मार्गदर्शक निर्देश वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती यांना देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील ग्रामीण भागातील रूग्णवाहिका वारंवार नादुरूस्त होत असल्याबाबत

**(१७) * ६५२४६ श्री. प्रशांत रामशेठ ठाकूर, श्री. समीर त्र्यंबकराव कुणावार, ॲड. आशिष बाबाजी शेलार, श्री. अतुल भातखळकर, श्री. अमित भास्कर साटम, श्री. महेश बालदी, श्रीमती मनिषा अशोक चौधरी, डॉ. भारती हेमंत लव्हेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील ग्रामीण भागातील रूग्णांवर तातडीने उपचार करण्यासाठी गेल्या ९ वर्षापासून सुरू केलेल्या १०८ क्रमांकाच्या २३ रूग्णवाहिकांपैकी काही रूग्णवाहिका बंद असून काही वारंवार नादुरूस्त होत असल्याने रूग्णांना रूग्णालयात नेताना गैरसोयीचे होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, संबंधित विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षतेमुळे रूग्णवाहिन्यांची देखभाल व दुरूस्ती वेळेवर न केल्यामुळे त्या बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने रुग्णवाहिका सुस्थितीत ठेवणे तसेच त्या नादुरूस्त राहण्यास जबाबदार असण्याऱ्या संबधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही,

रायगड जिल्हयातील १०८ क्रमांकाच्या एकूण २३ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक रायगड यांच्या अहवालानुसार कोणतीही रुग्णवाहिका बंद अवस्थेत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ तालुक्यात एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत नवजात बालकांना वाटप करण्यात येण्याऱ्या बेबी केअर कीट मधील वस्तूच्या वैधतेबाबत

**(१८) * ७०१९१ श्री. शिरीष मधुकरराव चौधरी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय **:-**

(१) भुसावळ तालुक्यात एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत नवजात बालकांना देण्यात येणारे मोफत बेबी केअर कीट मधील वस्तू मुदतबाह्य असूनही सदर कीटचे वाटप सर्रास सुरू असल्यामुळे याचा परिणाम बालकांच्या आरोग्यावर होत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) भुसावळ तालुक्यात मुदतबाह्य बेबी केअर किटचे वाटप सर्रास सुरु असणे, ही बाब खरी नाही.

तथापी, भुसावळ प्रकल्पातील मौजे कुऱ्हा पानाचे येथील अंगणवाडी केंद्रात दीर्घ काळ २ बेबी केअर किट पडून राहिल्याने ते मुदतबाह्य झाले होते, त्यापैकी एक किट लाभार्थ्यांच्या नातेवाईकांना देण्यात आले होते . परंतु, संबधित सेविकेच्या लक्षात आल्यानंतर सदरचे किट लाभार्थीच्या नातेवाईकांकडून परत घेऊन त्यांना नवीन किटचे वाटप केलेले आहे .तसेच, सदर महिला लाभार्थी यांच्या बाळाचा जन्म माहेरी झालेला असल्यामुळे सदर महिला लाभार्थी माहेरी असून नव्याने वाटप केलेले किट सासरी नातेवाईकांकडे पडून आहे . सदर किटमधील कोणत्याही साहित्याचा वापर केलेला नाही .सदर बेबी केअर किटबाबत संबधित लाभार्थी तसेच त्यांचे नातेवाईक यांचेकडून कोणतीही तक्रार भुसावळ प्रकल्पात प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) भुसावळ प्रकल्पाकडून संबधित अंगणवाडी सेविकेला कारणे दाखवा नोटीस बजावून किटमधील वस्तुंची मुदत व दिनांक तपासून वाटप करण्याच्या दक्षता घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

पुरवठाधारकामार्फत भुसावळ प्रकल्पात विहीत मुदतीत बेबी केअर किटचा पुरवठा करण्यात आला होता. परंतु अंगणवाडी केंद्रातील सेविकेमार्फत दीर्घकाळ शिल्लक राहिलेले बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले होते. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरोग्य सेवेतील मास्टर ऑफ डेंटल सर्जरी (एमडीएस) उत्तीर्ण 'पीजी' डॉक्टरांना तातडीने नियुक्त्या देण्याबाबत

**(१९) * ७०९५३ श्री. मोहन गोपाळराव मते**: सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय **:-**

(१) राज्य शासनाच्या आरोग्य सेवेतील मास्टर ऑफ डेंटल सर्जरी (एमडीएस) उत्तीर्ण 'पीजी' डॉक्टरांची माहे ऑगस्ट, २०२२ पासून नियुक्ती प्रलंबित असल्याचे दिनांक १२ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नियुक्त्या प्रलंबित असल्याने त्याचा परिणाम रुग्ण सेवेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मास्टर ऑफ डेंटल सर्जरी (एमडीएस) उत्तीर्ण 'पीजी' डॉक्टरांच्या तातडीने नियुक्त्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) सामान्य राज्य सेवा, गट-ब या संवर्गातील दंतशल्यचिकित्सकांची सेवांतर्गत पदव्युत्तर / पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यानंतरची सुधारित पदस्थापना देण्यात आली आहे. तत्पूर्वी दि.१९.३.२०१९ च्या शासन निर्णयानुसार सुधारित पदस्थापना मिळेपर्यंत संबंधितांना पूर्वी ज्या परिमंडळात कार्यरत होते, त्या परिमंडळात तात्पुरती पदस्थापना देण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.
(३) कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील शेवाळी नाला योजनेच्या दाभाडीसह बारा गावांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असल्याबाबत**

**(२०) * ६५०९३ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील शेवाळी नाला योजनेच्या दाभाडीसह बारा गावांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बारा गावांना सुरळीत पाणी पुरवठा होत नसल्याने नागरिकांना दोन किलोमिटर डोंगर उतरुन तसेच वन्यप्राण्यांचा धोका पत्करुन पाणी आणावे लागत असल्याने यावर मात करण्यासाठी चणकापूर धरणातून तातडीने आवर्तन सोडण्याची मागणी पाटबंधारे विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात ग्रामस्थांनी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २६ गाव पाणी पुरवठा योजनेबाबत दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले असून याबाबत बैठक घेण्याचे आश्वासित करुनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, जळगाव ग्रामीण मधील नशिराबाद येथेही ग्रामस्थांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत असून महिन्यातून केवळ तीन वेळा पाणी पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठया
च्या योजना मंजूर असताना ठेकेदारांच्या मनमानीमुळे अनेक योजना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) दहिवाळ व २६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेबाबत झालेल्या आंदोलनाबाबत दिनांक ०६.०७.२०२३ रोजी अप्पर जिल्हाधिकारी मालेगांव येथे प्रांताधिकारी यांचे उपस्थितीत बैठक झाली. सदर बैठकीत योजनेतून सुरळीत पाणी पुरवठा होणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना पंपिंगसाठी योग्य दाबाने विद्युत पुरवठा उपलब्ध करून देणेबाबत सुचना देण्यात आल्या, तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत नविन पंप पुढील दोन महिन्यात पुरविणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) अंशत: खरे आहे.

नशिराबाद नगर परिषद मार्फत नशिराबाद शहरासाठी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ६ दिवसाआड करण्यात येत आहे. नशिराबाद भागात गारपीट व वादळी वाऱ्यामुळे विद्युत पोल उखडून पडल्यामुळे मे, २०२३ दरम्यान पाणी पुरवठा करण्यासाठी विलंब झाला होता. सद्य:स्थितीत शहराचा पाणी पुरवठा सुरळीत व मुबलक करण्यात आलेला आहे.

(५) हे अंशत: खरे आहे.

राज्यात जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेकरीता ३३८१८ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकरीता ९२९ पाणी पुरवठयाच्या योजना मंजूर झाल्या असून वरील सर्व योजनांचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर सुरु आहेत. ठेकेदारांमुळे योजना प्रलंबित नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच जळगाव जिल्ह्यांमध्ये ज्या योजनांची कामे ठेकेदारांकडून धिम्या गतीने होत आहेत अशा योजनांच्या ठेकेदारांना दंडात्मक नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(६) उपरोक्त उत्तर भाग-३ व भाग-४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उदभवत नाही.

----------------

## राज्यातील अंगणवाडी केंद्रांना इंधन भत्ता तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(२१) * ६४५९८ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी केंद्रात पोषण आहार शिजवण्यासाठी आवश्यक असलेला इंधन भत्ता माहे जून, २०२२ पासून मिळाला नसल्याने अंगणवाडी सेविकांना अकारण आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात दिनांक १ एप्रिल,२०२३ रोजी पासून वाढ करण्याचा निर्णय घेतला परंतू त्यांची अंमलबजावणी अद्यापी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील अंगणवाडी सेविकांना माहे मार्च-एप्रिल, २०२३ या महिन्याचे मानधन अद्याप मिळाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच,अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यासाठी केलेल्या संपाच्या कालावधीतील वेतनाची कपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अंगणवाडी केंद्रांना नियमित इंधन भत्ता, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्याची पूर्तता करणे तसेच मानधनात वाढ करण्याच्या निर्णयाची नियमित अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील अंगणवाडी केंद्रात पोषण आहार शिजवण्यासाठी आवश्यक असलेला इंधन भत्ता अदा करण्याकरिता जिल्हा परिषदांना त्यांच्या मागणीनुसार रक्कम अदा करण्यात आली आहे. जिल्हा परिषदांकडून करण्यात येणा-या मागणीनुसार रक्कम अदा करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

अंगणवाडी सेविका,अंगणवाडी मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये दिनांक १.०४.२०२३ पासून वाढ करण्यास शासन निर्णय दिनांक ३.०४.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार माहे एप्रिल, २०२३ पासून मानधन वाढ विचारात घेऊन मानधन अदा करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

राज्यातील अंगणवाडी सेविकांचे माहे मार्च-एप्रिल २०२३ या महिन्याचे मानधन माहे मे, २०२३ मध्ये अदा करण्यात आले आहे.

(४) हे खरे आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी केलेल्या संपाच्या कालावधीतील मानधनाची कपात प्रकल्पस्तरावरुन करण्यात आली होती.

(५) इंधन भत्याची रक्कम मागणीनुसार अदा करण्यात येईल. तसेच अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदनतीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना दिनांक ३.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली मानधन वाढ प्रत्यक्षपणे माहे एप्रिल, २०२३ पासून अदा करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील हिंगणा एमआयडीसीतील कटारिया ॲग्रो प्रोडक्ट या कारखान्यात झालेल्या स्फोटामध्ये कामगारांचा झालेला मृत्यू

**(२२) * ६४७७५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील हिंगणा एमआयडीसीतील सोनेगाव (निपाणी) येथे कटारिया ॲग्रो प्रॉडक्ट या कारखान्यात दिनांक २४ एप्रिल २०२३ रोजी वा त्यासुमारास भीषण स्फोट होऊन तीन कामगारांचा मृत्यू झाला तर तीन कामगार गंभीर जखमी झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटातील मृत व गंभीर जखमी कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

कटारिया ॲग्रो प्रा. लि. प्लॉट नं. ई-५२, एमआयडीसी हिंगणा, हिंगणा रोड, जि.नागपूर या कारखान्यात दि. २४ एप्रिल, २०२३ रोजी कारखान्यातील एक एअर कॉम्प्रेसर फुटून, शॉर्ट सर्किट होऊन कारखान्यात आग लागली. सदर आगीच्या दुर्घटनेमध्ये ३ कामगारांचा भाजल्यामुळे मृत्यू झाला आहे. तसेच ३ कामगार भाजल्यामुळे जखमी झाले आहेत. तथापि, सदर कामगारांना कोणत्याही प्रकारचे अपंगत्व आलेले नाही.

(२) व (३) सदर कारखान्यातील आगीच्या दुर्घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान घटनेच्या दिवशी कारखान्यातील उत्पादन विभागात एक एअर कॉम्प्रेसर फुटून, शॉर्ट सर्किट होऊन कारखान्यात आग लागल्याचे निदर्शनास आले.

तसेच, चौकशीमध्ये महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियमांचा भंग आढळून आला असल्याने, कारखान्याच्या भोगवटादाराविरुद्ध अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयात दि.०५.०७.२०२३ रोजी खटला क्र. C२०२३०००००३ दाखल करण्यात आला आहे. सदर दुर्घटनेप्रकरणी पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.,नागपूर शहर येथे अप.क्र.४६४/२३ असा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

कारखाना व्यवस्थापनाने सदर दुर्घटनेतील मृत कामगाराच्या वारसांना सानुग्रह अनुदान म्हणून रु.२२.०० लाख इतकी रक्कम अदा केलेली आहे. तसेच, जखमी कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा रु.१२,८१,४१३/- इतका खर्च कारखाना व्यवस्थापनाने केलेला असून, सदर जखमी कामगारांना वैद्यकीय उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे.

तसेच,सदर दुर्घटनेतील मृत व जखमी कामगार हे राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत नोंदणीकृत आहेत. सदर योजनेअंतर्गत ३ मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: ठाणे, पालघर, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पाणीटंचाईची समस्या दूर करण्याबाबत

**(२३) * ६४७४७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: ठाणे, पालघर, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यात मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली असून ९०९ गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जात असून त्यामध्ये अधिक ३०० गावांना पाणी पुरवठा करण्याची मागणी वाढली असल्याचे दिनांक १७ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यात २०० पाणी योजना व सध्याच्या १८८ जलजीवन मिशनच्या योजना बारगळल्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी दरवर्षी ५० कोटींचा आराखडा तयार करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर तालुक्यातील पाणी टंचाई निवारणार्थ ९७ आदिवासी पाडे आणि २५९ गावांसाठी जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत २८६ कोटी ८५ लाख रुपये खर्चाची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना शासनाने मंजूर केल्यानंतर माहे ऑगस्ट, २०२२ पासून या योजनेच्या कामास प्रत्यक्षात मुंबईतील श्री.आर. ए. घुले या ठेकेदार कंपनीच्या मार्फत सुरुवात झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील धरणांमध्ये पुरेसा पाणी साठा उपलब्ध असतानाही टँकर सुरु करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, उपरोक्त जिल्ह्यात टँकर व त्यांच्या दरवाढीमागे टँकरमाफीया व प्रशासनाचे संगनमत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) शासनाच्या शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९ मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व ग्रामीण भागात पाणी टंचाई निवारणार्थ टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे, नळ पाणी पुरवठा विशेष दुरुस्ती व इतर उपाययोजना हाती घेण्यात येतात. त्यानुसार प्रश्नाधिन जिल्हयांमध्येही स्थानिक प्रशासनाकडून टँकरद्वारे खालीलप्रमाणे पाणी पुरवठा करण्यात आला आहे :-

| जिल्हा | गाव | वाडया | टँकर संख्या |
|---|---|---|---|
| ठाणे | ५४ | १६६ | ३९ |
| पालघर | २८ | ९८ | ३९ |
| रायगड | ७४ | २९० | ३९ |
| रत्नागिरी | ६७ | १२८ | १५ |

(२) हे, खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाही.

ठाणे जिल्हयातील ग्रामीण भाग डोंगराळ व मध्यम भागात येत असून हा भुभाग बेसॉल्ट या अग्नीजन्य खडकाने व्यापलेला असून त्याची जलधारणा क्षमता अत्यल्प आहे. त्यामुळे जिल्हयातील भौगोलिक परिस्थिती, भूशास्त्रीय संरचना, भूजधारक खडकाची अत्यल्प जलधारण क्षमता यामुळे माहे जानेवारी ते जुन दरम्यान काही ठिकाणी टंचाईसदृश्य स्थिती निर्माण होते.

(५) व (६) हे खरे नाही.

जिल्हयातील गाव/पाडयांना टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसेवक/ सरपंच यांच्या मागणी पत्रानुसार मागणी करण्यात येते. त्यानंतर उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, गट विकास अधिकारी व तहसिलदार यांच्या मार्फत पहाणी करुन उप विभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर केला जातो. टँकर मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असल्याने टँकर जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने मंजूरी होतात.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## औंध सांगवी (जि.पूणे) येथील जिल्हा रुग्णालयातील औषध खरेदीचे ऑडिट व रुग्णांना पुरेसा औषध पुरवठा करणेबाबत

**(२४) * ७०२२० श्रीमती माधुरी मिसाळ, श्रीमती अश्विनी जगताप, श्री. सुनिल टिंगरे, श्री. सिध्दार्थ शिरोळे:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध सांगवी (जि.पूणे) येथील जिल्हा रुग्णालयात मधुमेह, ब्लड प्रेशर व इतर दुर्धर आजाराचे गरीब कुटुंबातील रुग्ण उपचाराकरता येत असून त्यांची तपासणी झाल्यानंतर त्यांना रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याने औषध विभागातील फार्मसिस्ट व कर्मचाऱ्यांकडून बाहेरून औषधे व गोळ्या विकत घेण्याचा सल्ला देत असल्याने रुग्णांना स्वखर्चाने औषधे बाहेरुन विकत घ्यावी लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाला स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक ६ मार्च २०२३ रोजी वा त्यासुमारास भेट दिली असता रुग्णांना सर्व औषधे वेळेवर देण्याची सूचना जिल्हा शल्य चिकित्सक व रुग्णालयातील फार्मासिस्ट व औषधे खरेदी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या होत्या ,हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या रुग्णालयाचे पीपीपी मॉडेलच्या नावाखाली खाजगीकरण करण्यासंदर्भात मा. मंत्री यांनी बैठक घेतली असून त्याअनुषंगाने या रुग्णालयाचे खाजगीकरण करण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने या रुग्णालयातील औषध खरेदी व उपलब्धता यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी व लेखापरिक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच या रुग्णालयातील रुग्णांना औषधे मोफत व वेळेवर मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) जिल्हास्तरावर वेगवेगळया स्त्रोतांव्दारे उपलब्ध होणाऱ्या निधीतून रुग्णांना औषधे मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिसे (ता.भिवंडी,जि.ठाणे) गावातील बालिकेचा इंदिरा गांधी रुग्णालयात उपचार नाकारल्याने झालेला मृत्यू

**(२५) * ६६०७८ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिसे (ता.भिवंडी,जि.ठाणे) गावातील कातकरी वाडीतील दहा महिन्यांच्या बालिकेचा भिवंडी येथील इंदिरा गांधी रुग्णालयात उपचार नाकारल्याने मृत्यू झाला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बालिकेस उपचारासाठी सदर रुग्णालयात आठ तास दाखल करून घेण्यात आले नाही व त्यानंतर रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यानंतर उपचारासाठी तिला कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल केले असता तिचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेबाबत विविध संघटनांनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी करुन संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात तालुका पातळीवर असलेल्या रुग्णालयामध्ये सर्पदंशांची औषधे उपलब्ध करून देण्याबाबत

**(२६) * ६४९६४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण येथील अमित सोनकर (वय १५ वर्ष) व सायदे ग्रामपंचायत मधील बोरीची वाडी (ता. मोखाडा, जि. पालघर) येथील छाया सखाराम भोई (वय ७ वर्ष) यांचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याचे दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास ,या दोन्ही प्रकरणातील मुलांना दवाखान्यात नेऊनही योग्य उपचार न मिळाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील बहुतांश रुग्णालयात योग्य औषधसाठा उपलब्ध नसल्यामुळे सर्पदंशामुळे अनेकांचे मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,राज्यात किमान तालुका पातळीवर असलेल्या रुग्णालयामध्ये सर्पदंशांची औषधे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.
(४) राज्यातील आरोग्य संस्थामध्ये पुरेशा सर्पदंशावरील औषध साठा उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी येथील आरकेजी गोडाऊन वोलॅडो कंपनीत लिफ्ट कोसळून झालेल्या अपघातात एका कामगाराचा झालेला मृत्यू

**(२७) * ६४७७७ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी येथील पिंपळास गावाच्या हद्दीतील भुमी वर्ल्ड या गोदाम संकुलाजवळील आरकेजी गोडाऊन वोलॅडो कंपनीत दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लिफ्ट कोसळून झालेल्या अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघाताची नोंद कोनगाव पोलिस ठाण्यात चुकीच्या पध्दतीने नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली तसेच मृत कामगाराच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे** : (१) हे खरे आहे.

मे.वोलॅडो एलपीपी, इमारत नं.५, युनिट नं.७ राधाकृष्ण पार्क, भूमीवर्ल्ड जवळ, पिंपळास गाव, भिवंडी, जि.ठाणे येथील बांधकाम दिनांक ०२.०३.२०२३ रोजी दुसऱ्या माळयावर जात असताना लिफ्टचा दरवाजा पहिल्या माळयावर अडकल्याने आणि त्यानंतर लिफ्टचा रोप तुटून लिफ्ट खाली आदळल्याने गोपाळ भिका मुकणे या कामगाराच्या डोक्यास मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला.

(२) व (३) दिनांक ०२.०३.२०२३ रोजी कोनगाव पोलीस ठाणे जि.ठाणे शहर येथे अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर ०९/२०२३ भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून सदर अपघाताच्या चौकशीअंती चौकशी अधिकारी यांनी शासनातर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मयत कामगारांविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-अ अन्वये गुन्हा () क्र.०१६५/२०२३, दिनांक १९.०५.२०२३ रोजी कोनगाव पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

सहायक कामगार आयुक्त कार्यालय, भिवंडी यांच्या कार्यालयाअंतर्गत क्षेत्रिय निरीक्षक यांनी संबंधित आस्थापनेस भेट देऊन महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७, किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत निरीक्षण शेरे पारीत करण्यात आले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मयत कामगाराच्या वारसदारांस अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांचे कार्यालयास दिनांक ३०.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच आस्थापना मालकाकडून मयत कामगाराच्या वारसदार पत्नी श्रीम.हिरा गोपाळ मुकणे ह्यांना रु. १,५०,०००/- व मयत कामगाराचा वारसदार मुलगा श्री.प्रकाश गोपाळ मुकणे यांस रु.२,००,०००/- इतकी आर्थिक नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त उभय पक्षात करार झाल्यानुसार

रु.४,५०,०००/- इतकी रक्कम मयत कामगाराच्या पत्नीस अदा करण्यासाठी Post Dated धनादेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.